## B.A. Part–I Semester—I Examination

## (Compulsory Languages)

## MARATHI

वेळ : तीन तास] [एकूण गुण : 80

**सूचना:—** बहुपर्यायी प्रश्नांसाठी सुरूवातीस सोडविलेल्या प्रश्नांची उत्तरे मूल्यांकन करतांना गृहित घटली जातील.

1. 'चालाल तर वाचाल!' या पाठातून व्यायामाचे महत्त्व डॉ. अभय बंग यांनी कसे अधोरेखित केले आहे ?

**किंवा**

'शिक्षण हे कर्तव्यकमीचे आनुषंगिक फळ आहे' असे विनोबा भावे यांना का वाटते ? ते सोदाहरण विवेचन करा. 16

2. आंगणाची होत असलेली दुरावस्था 'आंगण' या पाठातून मधुकर केचे यांनी कशी अधोरेखित केली आहे ?

**किंवा**

'शेतकऱ्यांच्या आत्महत्या रोकण्याकरिता 'इर्जिक' सारखी संस्कृती समाजात रूजविणे गरजेचे आहे' हे लेखकाने 'इर्जिक' मधून कसे सूचित केले आहे ? 16

3. (अ) श्रीविठ्ठल भेटीच्या आर्ततेची कोणकोणती उदाहरणे संत ज्ञानेश्वरांनी दिली आहेत ? स्पष्ट करा.

**किंवा**

राष्ट्रसंत तुकडोजी महाराजांना महालांपेक्षा आपली झोपडीच का श्रेष्ठ वाटते ? परामर्श घ्या. 8

(ब) सामाजिक दंभाच्या विरोधात लढा देण्याचे आवाहन 'स्फूर्ति' या कवितेतून कसे अभिव्यक्त झाले आहे ?

**किंवा**

'अंधारयांत्रिक' होण्याचे नाकारलेच पाहिजे' असे नामदेव ढसाल का म्हणतात ? ते 'आत्ता' या कवितेच्या आधारे विशद करा. 8

4. (अ) लेखनविषयक नियम म्हणजे काय ? ते सांगून लेखनविषयक नियमांतील अन्यनियम स्पष्ट करा.

**किंवा**

लेखनविषयक नियमांचा वापर करून उतारा शुद्ध करा.

भारतीय संस्कृतित एकेका सद्‌गूणासाठी, एकेका ध्येयासाठी, सर्वस्वाचे समर्पण करणाऱ्या महान विभुती आपणास दिसतात. भारतीय संस्कृति म्हणजे या विभुतींचा इतिहास. 'थोर पूरुषांची चरीत्रे म्हणजे इतिहास' असे एक वचन आहे. भारतीय संस्कृतिचा इतिहास, भारतीय संताचा इतिहास, भारतीय विरांचा इतिहास. 8

(ब) मुद्रितशोधन म्हणजे काय ? ते सांगून मुद्रित शोधनाची विश्वासार्हता स्पष्ट करा.

**किंवा**

मुद्रितशोधन म्हणजे काय ? ते सांगून मुद्रितशोधनाच्या खुणांचा परिचय करून द्या. 8

5. खालील बहुपर्यायी प्रश्न सोडवा :—

(1) भगवंतानी अर्जुनाला कुरूक्षेत्रात ____________ सांगितली.

(अ) ग्रामगीता (ब) भगवद्‌गीता

(क) गीताटीका (ड) गीताई

(2) जीवनाच्या तयारीचे ज्ञान म्हणतो ते जीवनापासून अजिवात अलिप्त राखू पाहतो, त्यामुळे सदर ज्ञानाने ____________ तयारी होते.

(अ) जीवनाची (ब) शिक्षणाची

(क) समाजाची (ड) मरणाची

(3) स्वत:ला मरण येईल असे नक्की माहित असताही ____________ याने आपली कवचकुंडले कापून काढून दिली.

(अ) बली (ब) ध्रुव

(क) प्रहलाद (ड) कर्ण

(4) प्रजेने लावलेल्या झाडांस हात लावू नका असे आज्ञापत्र काढणारे ____________ .

(अ) राजा अशोक (ब) राजा दशरथ

(क) राजा हरिश्चंद्र (ड) छत्रपती शिवाजी महाराज

(5) जेकाम करताना थोडा धाम येतो व थोडा दम लागतो तो ____________ प्रतीचा व्यायाम.

(अ) तीव्र (ब) मध्यम

(क) हलक्या (ड) यापैकी नाही

(6) ____________ गेल्यावर अवधं जंगल, अवधं आकाश, अवधासूर्य आपल्या डोळयांच्या कवेत येतो.

(अ) गावाला (ब) फिरायला

(क) प्रवासाला (ड) कामाला

221

(7) मधुकर केचे हे खेडं सोडून शहरात राहायला गेले, तेव्हा त्यांचं ____________ घर त्यांच्यापासून दूर गेलं.

(अ) झोपडीचं (ब) गावातलं

(क) मजल्याचं (ड) कौलारू

(8) अन्वरशाची ____________ हीच त्याची भाषा नि गावावरील प्रेम हीच त्याची नशा होती.

(अ) मराठी (ब) हिंदी

(क) वऱ्हाडी (ड) उर्दू

(9) अन्वरशाला किती पोरी होत्या ?

(अ) एक (ब) तीन

(क) दोन (ड) सहा

(10) 'इर्जिक' हा लेख ____________ या ग्रंथातून घेतला आहे ?

(अ) पाचरुट (ब) गावमोहर

(क) एक एक गाड़ी गवताची (ड) इर्जिक

(11) इथली माती आजपर्यंत ती सम्राटऐवजी ____________ झुकत राहिली.

(अ) कुबेरापुढे (ब) शेतकऱ्यांपुढे

(क) कामगारांपुढे (ड) संतापुढे

(12) __________ भरुनी वाटी लावीन तुझे वोंठी।

सत्य सांगें गोठी विठो येईल कायी।।

(अ) पाणी (ब) लोणी

(क) दूधें (ड) तुपें

(13) __________ म्हणे केला मळा।

विठ्ठला-पायी गोविला गळा।।

(अ) नामा (ब) जनी

(क) एकाजनार्दनी (ड) सावता

(14) ____________ भरू द्या पेला, फेस भराभर उसळू द्या.

(अ) पूर्ण (ब) अपूर्ण

(क) अर्धा (ड) काठोकाठ

221 221 221 221 221

(15) राजास जी महाली सौख्ये कधी मिळाली।

ती सर्व प्राप्त झाली, या __________ माझ्या।।

(अ) महालात (ब) घरात

(क) शहरात (ड) झोपडीत

(16) नेला __________ माल.

नाई हुंगलं वो कोनी.

(अ) शेतात (ब) पुरात

(क) सावकाराच्या घशात (ड) बाजारात 1×16=16

221 221 221 221 221